| | |
|---|---|
| MHKO160003772024 | दाखल तारीख - १९/०८/२०२४<br>नोंदणी तारीख - २०/०८/२०२४<br>निकाल तारीख - १०/०३/२०२६<br>कालावधी - ०१ वर्षे ०६ महिने २१ दिवस |

**नियमित फौजदारी खटला क्र.४४/२०२४** **निशानी क्र.**

**भाग अ**

( फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद क्र. ४४(i) अन्वये )

| | | |
|---|---|---|
| **शाहूवाडी येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी**<br>**ता. शाहुवाडी, जि. कोल्हापुर यांचे न्यायालयात**<br>( पिठासिन अधिकारी - पी.बी. पवार यांचेसमोर )<br>न्यायनिर्णय घोषित – दिनांक १०/०३/२०२६<br>( नियमित फौजदारी खटला क्र.४४/२०२४ ) | | |
| गुन्हा नोंद क्र.-२०५/२०२३, शाहुवाडी पो. ठाणे, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापुर | | |
| फिर्यादी / तक्रारदार | :- | महाराष्ट्र शासन,<br>मार्फत पोलीस निरीक्षक, शाहूवाडी पो. ठाणे,<br>ता. शाहूवाडी, जि. कोल्हापुर |
| अभियोग पक्षातर्फे विधिज्ञ | :- | सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती एस. बी. चिमटे |
| आरोपीं | :- | योगेश ज्ञानदेव चौगुले, व.व.२२, धंदा-मजुरी,<br>रा.- माणगांव, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर |
| आरोपींतर्फे विधिज्ञ | :- | श्रीमती आर.बी.गावडे |

**भाग ब**

( फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद क्र. ४४(ii) अन्वये )

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | :- | ०५/०७/२०२३ |
| फिर्याद दाखल दिनांक | :- | १०/०७/२०२३ |
| दोषारोप निश्चित केल्याचे दिनांक | :- | ०५/०२/२०२५ |

| | | |
|---|---|---|
| पुरावा सुरू झाल्याचा दिनांक | :- | २७/०१/२०२६ |
| न्यायनिर्णसाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | :- | १०/०३/२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | :- | १०/०३/२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | :- | निरंक, आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात येते |

## आरोपींची माहिती

| आरोपी क्र | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जामीनावर सोडलेचा दिनांक | गुन्हयाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वये समायोजित (Set Off) करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | योगेश ज्ञानदेव चौगुले | १२/०७/२०२३ | १३/०७/२०२३ | भा.दं.वि.सं.कलम ३७९ अन्वये | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |

## भाग क

( फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद क्र. ४४(iii) अन्वये )

### अ अभियोग पक्षातर्फे साक्षीदार

| सा. क्र. | साक्षीदाराचे नाव | स्वरूप | निशाणी |
|---|---|---|---|
| १ | दिपक दगडू घोलप | फिर्यादी | १३ |

### क न्यायालयातर्फे निशाणी -(फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १ | १ | दोषारोपपत्र |
| २ | नि.१ सोबत | अटकेचे नमुने |
| ३ | नि.१ सोबत | निवेदन |
| ४ | १४ | फिर्याद |

**न्यायनिर्णय**

**(घोषित दि. १०/०३/२०२६)**

१. आरोपीविरूध्द भारतीय दंड संहिता १८६० चे कलम ३७९ सह ३४ अन्वये गुन्हा केल्याचा आरोप ठेवून संपरिक्षित करण्यात आले आहे.

२. अभियोगपक्षाची हकीकत थोडक्यात अशी की, -

घटना ही दिनांक ०५/०७/२०२३ रोजी १७.०० वा.चे सुमारास उदगीरी, ता. शाहुवाडी गावचे हद्दीत उंबराचे माळ नावाचे शेतात फिर्यादी यांचे पडीक जागेत घडली आहे. फिर्यादी यांची एक खिल्लारी जातीचा काळ्या पांढ-या रंगाचा बैल, एक तांबुस रंगाचा गावठी जातीचा एक बैल, एक म्हैस चार येताची काळ्या रंगाची घोमटी शिंगे असलेली म्हैशीला वेसन व मुरखी व ६ फुट रस्सी सोबत असलेली अशी जनावरे आरोपीने फिर्यादीचे संमतीशिवाय लबाडीचे इराद्याने चोरून नेऊन त्यापैकी एक बैल पेठवडगाव जनावरांचे बाजारामध्ये सा.क्र.६ आसिफ इमामसाहब बेपारी यास सदरचा बैल चोरीचा आहे असे न सांगता विक्री केली. त्यानंतर फिर्यादीने वर नमूद घटनेबाबत शाहूवाडी पो. ठाणे येथे आरोपीविरूध्द फिर्याद नोंदविली आहे.

३. फिर्यादी यांनी दाखल केलेल्या फिर्यादीवरून आरोपीविरूध्द शाहूवाडी पा. ठाणे येथे गु.र.नं.२०५/२०२३ हा दाखल होवून त्याचा तपास पो.ना.- ए.एस.पावरा यांचेकडे वर्ग झाला होता. तपासअधिकारी यांनी तपासादरम्यान घटनास्थळाचा आणि मुद्देमाल जप्तीचा पंचनामा केला, साक्षीदारांचे जबाब नोंदविले आणि तपासाअंती आरोपीविरूध्द पुरेसा पुरावा उपलब्ध झाल्यानंतर त्यांचेविरूध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहे.

४. यापूर्वी मी आरोपीं यांचेविरूध्द निशानी ७ येथे दोषारोप निश्चित केला आहे, आरोपीं यांना निशानी ७ वरील दोषारोप वाचून, समजावून सांगितला असता त्यांनी अपराधाची कबूली दिली नाही आणि संपरिक्षेची तयारी दर्शविली. तसेच आरोपीं यांचेविरूध्द पुरेसा पुरावा उपलब्ध न झालेने फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ३१३ प्रमाणे त्यांचे जबाब नोंदविण्यात आलेले नाहीत.

५. अभियोग पक्षाचा खटला, अभिलेखावरील पुरावा यावरून माझे विचारार्थ खालील मुद्दे आले आहेत व त्यावरील निष्कर्ष मी कारणमिमांसेसह पुढीलप्रमाणे देत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | आरोपी यांनी दिनांक ०५/०७/२०२३ रोजी १७.०० वा.चे सुमारास उदगीरी, ता. शाहुवाडी गावचे हद्दीत उंबराचे माळ नावाचे शेतात फिर्यादी यांची एक खिल्लारी जातीचा काळ्या पांढ-या रंगाचा बैल, एक तांबुस रंगाचा गावठी जातीचा एक बैल, एक म्हैस चार येताची काळ्या रंगाची घोमटी शिंगे असलेली म्हैशीला वेसन व मुरखी व ६ फुट रस्सी सोबत असलेली अशी जनावरे आरोपीने फिर्यादीचे संमतीशिवाय लबाडीचे इराद्याने चोरून नेऊन त्यापैकी एक बैल पेठवडगाव जनावरांचे बाजारामध्ये सा.क्र.६ आसिफ इमामसाहब बेपारी यास सदरचा बैल चोरीचा आहे असे न सांगता विक्री केली आणि त्याद्वारे आरोपीने भारतीय दंड संहितेच्या कलम **३७९** प्रमाणे शिक्षापात्र आणि या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा असा अपराध केला आहे हे अभियोगपक्ष सिध्द करतो काय? | नकारार्थी. |
| २ | आदेश काय | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे. |

## कारणमिंमासा

## मुददा क्र. १ करीता -

६ अभियोगपक्षाने त्यांची बाजू सिध्द करण्यासाठी प्रकरणामध्ये एका साक्षीदाराची साक्ष नोंदविली आहे. आरोपीं व फिर्यादी यांचे दरम्यान तडजोड झाल्यामुळे अभियोगपक्षातर्फे अन्य साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आलेली नाही. तसेच यातील फिर्यादी व आरोपी यांनी नि.१२ वर त्यांचेमध्ये आता कोणत्याही प्रकारचा वाद शिल्लक नसून फिर्यादीस यापुढे केस चालविणेची नाही अशा आशयाची संयक्तिक पुरशिस दाखल केली आहे.

७. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र १ दिपक दगडू घोलप हे घटनेमध्ये फिर्यादी आहेत. सदर साक्षीदार याने त्याचे साक्षीमध्ये कथन केले की घटनेबाबत त्यांना काही

आठवत नाही. फिर्यादी साक्षीदार यांना फिर्याद दाखविली असता त्यावरील सही नि.१४ साक्षीदाराने ओळखली मात्र त्यामधील मजकूर त्यास माहीती नसल्याचे कथन केले. सदर साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करीत नसल्याने त्याचा उलटतपास घेण्याची परवानगी सरकारी वकिलांना देण्यात आली. सरकारपक्षातर्फे उलट तपासामध्ये सदर साक्षीदाराने अभियोग पक्षास मदत होईल अशी कोणतीही घटना कथन केली नाही. तसेच उलटतपासामध्ये साक्षीदाराने कथन केले की त्याचे व आरोपीं यांचेमध्ये न्यायालयाबाहेर आपसात तडजोड झाली आहे.

८. अभियोग पक्षाचे वरील साक्षीदारांचे साक्षीमधून अभियोग पक्षास मदत होईल अशी कोणतीही घटना अभिलेखावर आलेली नाही. तसेच यातील फिर्यादी व आरोपीं यांनी नि.१२ वर त्यांचेमध्ये आता कोणत्याही प्रकारचा वाद शिल्लक नसून फिर्यादीस यापुढे केस चालविणेची नाही अशा आशयाची संयक्तिक पुरशिस दाखल केली आहे. त्यामुळे अभियोग पक्षातर्फे अन्य कोणत्याही साक्षीदाराची साक्ष सदरकामी नोंदविलेली नाही. अभिलेखावरील पुरावा, तसेच साक्षीदार यांचे साक्षीमधून आरोपींविरूध्दची अभिलेखावरील फिर्याद शाबित होत नाही व आरोपींविरूध्दचा दोषारोपपत्रातील नमूद गुन्हा शाबित होत नाही.

९. अभियोग पक्षातर्फे प्रस्तुत खटल्यामध्ये फिर्यादीमध्ये नमूद अ.क्र.४-२०२२ मॉडेल असलेला छोटा हत्ती नं. टाटा कंपनीचा एमएच-०९-एफएल-६६९२ जप्त करण्यात आला होता, सदरची जप्त गाडी ही हा मूळ मालकास सुपूर्तनाम्यावर परत देण्यात आली आहे.

१०. सबब, अभियोग पक्षाचे अभिलेखावरील पुराव्यावरून आरोपीविरूध्दचा दोषारोपामध्ये नमूद गुन्हा शाबीत होत नसलेने आरोपी प्रस्तुत गुन्हयातून निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. सबब वर नमूद चर्चेस अनुसरून मी मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष नकारार्थी असा नोंदवित आहे. आणि मुद्दा क्र. २ करीता खालील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

**१.** आरोपी योगेश ज्ञानदेव चौगुले याची भारतीय दंड संहिता १८६० चे कलम ३७९ अन्वये या गुन्हयातुन फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम २४८(१) नुसार निर्दोष मुक्तता करणेत येत आहे.

**२.** आरोपीचा जामीनकदबा रदद करणेत येवुन त्यास या गुन्ह्यातून स्वांतत्र्य देण्यात येत आहे.

**३.** प्रस्तुत गुन्हयातील जप्त मुद्देमाल अ.क्र.४- २०२२ मॉडेल असलेला छोटा हत्ती नं. टाटा कंपनीचा एमएच-०९-एफएल-६६९२ ही सुपूर्तनाम्यावर मूळ मालकास परत देण्यात आली आहे, सदरचा सुपूर्तनामा अपील कालावधीनंतर रद्द समजण्यात यावा व गाडी ही कायमस्वरूपी मुळ मालकचे ताब्यात ठेवण्यात यावी.

**४.** आरोपी याने फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ४३७ अ प्रमाणे जामीन दयावा.

**(खुल्या न्यायालयात घोषीत)**

Pankaj Bhimrao Pawar

**स्थळ - शाहूवाडी**
**दिनांक – १०/०३/२०२६**

**( पी.बी.पवार )**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**मलकापुर-शाहूवाडी, जि. कोल्हापुर**